मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सौ. मनीषा बर्वे यांनी देणगी दिलेले पुस्तक.
भेट
बा.वा.
3092
२८/७/०४

मुलांसाठी,

# महाकवी कालिदास

## ( भाग पहिला )

लेखिका -
सौ. मनीषा बर्वे.

BVBK-0403012

अटकमटक प्रकाशन, मुंबई.

● प्रकाशक :
'अटकमटक' बालनाट्य संस्था प्रकाशन
पुष्प ४ थे,
३०, मांगल्य, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.

● © सौ. मनीषा म. बर्वे
बी-३०, मांगल्य, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.

● अक्षरजुळणी :
नंदकिशोर द. फडके,
१७६/ए/२, पर्वती, पुणे ९.

● मुद्रक :
पॅड प्रिंटस्
पर्वती, पुणे ९.

● मुखपृष्ठ :
श्री. राजन काळसेकर,
निर्मिती ॲड., मुलुंड, मुंबई ४०० ०८'
फोन : ५६४ ५१ १४.

● प्रथमावृत्ती :
१८ मे १९९४

● मूल्य : चौदा रुपये

गेली २५ वर्षे माझ्यातल्या आत्मविश्वासाला खतपाणी
घालून माझं ' मी 'पण जपत
मला ' लिहिती ' ठेवणाऱ्या---
' मधूस '

अनुक्रमणिका


| कथेचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|
| १) कथा कालिदासाची | ०५ |
| २) मेघदूत | ०९ |
| ३) विक्रमोर्वशीय | २१ |
| ४) मालविकाग्निमित्र | २७ |

## मनोगत

संस्कृत काव्यशारदेच्या दरबारातील थोर रत्नांची - कालिदासादिकांची व त्यांच्या साहित्यसंपदेची ओळख तुम्हा मुलांना सोप्या भाषेत करून द्यावी असं कितीतरी दिवसांपासून मनात होतं. तुमच्यासाठी कालिदासाची कथा व त्याच्या साहित्याचा कथारुप अनुवाद मी 'मुलुंडदीप' या पाक्षिकासाठी केला होता. त्यापैकी कालिदासाची कथा व मेघदूत, विक्रमोर्वशीय आणि मालविकाग्निमित्र ह्या कथा या पुस्तकाच्या रुपाने तुमच्या हाती देताना मला फार समाधान वाटत आहे.

मुलांनो, तुम्हाला संस्कृतातील काव्यसौंदर्याचा आस्वाद घेता यावा, कालिदासाच्या उपमा, उत्प्रेक्षा व त्याची सुभाषितवजा असणारी वाक्यरचना तसेच त्याचे भाषासौंदर्य तुम्हाला परिचित व्हावे आणि या साऱ्यांचा उपयोग कळत-नकळत तुमच्या स्वत:च्या भाषासौंदर्यात वाढ होण्यासाठी व्हावा यादृष्टीने हा पुस्तकप्रपंच केला आहे. श्री. मधुसूदन बर्वे यांच्या विशेष प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळेच ह्या पुस्तकाचा 'सुयोग' जुळून आला आहे हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

'अटकमटक' प्रकाशनाने अत्यल्प वेळात अत्यंत जिव्हाळ्याने हे पुस्तक परिश्रमपूर्वक व देखण्या स्वरुपात तुमच्या हाती दिले तसेच चित्रकार श्री. राजन काळसेकर, मुद्रक श्री. फडके या साऱ्यांनी जे मन:पूर्वक व सक्रीय सहकार्य दिलं त्याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे.

मुलांनो, हे पुस्तक जरूर वाचा आणि त्यावरचा अभिप्राय कळवायला मात्र विसरू नका हं!

तुमची

सौ. मनीषा मावशी.

3692 28/7/012

# १ | कालिदास

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका गावी एक धनाढ्य गृहस्थ रहात असे. त्याला एकुलती एक उपवर कन्या होती. ही कन्या कुशाग्र बुद्धीची आणि अत्यंत देखणी होती. रत्नावली तिचे नाव. लाडक्या कन्येच्या विवाहाच्या काळजीनं तिचा पिता रोज विचार करून करून थकला. कारण रत्नावलीला कोणीही तरूण पसंत पडेना. शेवटी त्यानं तिला याचं कारण विचारलं. तेव्हा तिने सांगितले की, "जो तरूण माझ्या तीन प्रश्नाची उत्तरे समाधानकारक देईल व माझ्यापेक्षा बुद्धिमान असल्याबद्दल खात्री पटवून देईल त्यालाच मी वरमाला घालीन."

सर्वत्र दवंडी पिटवण्यात आली. अनेक तरूण आले आणि गेले पण रत्नावलीच्या परीक्षेला कोणीच उतरू शकला नाही. हळूहळू येणाऱ्यांच्या संख्येत घट होऊ लागली. आणि एकवेळ तर अशी आली की कुणीही तिकडे फिरकेना. रत्नावलीच्या बापाला तर आता फारच काळजी वाटू लागली. तो विचार करू लागला या अतिशहाण्या मुलीने आतापर्यंत कित्येक विद्वान तरूणांना अपमानित करून येथून घालवून दिले आहे. तेव्हा आता एखाद्या मूर्खाशीच हिची गाठ घालून दिली पाहिजे.

अशा मूर्खाच्या शोधात तो निघाला. खूप दूरवर गेल्यावर तो एका जंगलापर्यंत पोहोचला. त्या जंगलात एका झाडाच्या फांदीवर बसून एक माणूस ती फांदीच तोडत होता. याच्यासारखा दुसरा कोणी मूर्ख नसेल. इतका मूर्ख मनुष्य सगळ्या जगात तरी कोठे भेटेल का? असा विचार करून त्याला घेऊन रत्नावलीचा बाप रत्नावलीकडे आला. तिला म्हणाला, "मुली, तुझ्यासाठी त्रिखंड धुंडाळून हा सुयोग्य वर मी शोधून आणला आहे. हाच तुझ्या प्रश्नांची यथायोग्य उत्तरे देऊ शकेल असे

वाटते. तेव्हा तू याची परीक्षा घे."

बापाचे बोलणे ऐकून रत्नावली हसली. त्या गरीब माणसाकडे तुच्छतेने एकवार पाहून तिने त्याला पहिला प्रश्न विचारला,

"ब्रह्म म्हणजे काय?"

त्या बिचाऱ्याला कशाचा गंधच नव्हता. भल्याभल्यांनासुद्धा ज्या प्रश्नाचे उत्तर सापडले नव्हते ते त्याला कोठून येणार? त्याने इकडे तिकडे पाहिले. शेवटी चिडून त्याने तिला अंगठा दाखवला.

ती गोंधळून बापाकडे पाहू लागली. तेव्हा बाप म्हणाला, "त्यात एवढे गोंधळून जाण्यासारखे काय आहे? तुझ्या प्रश्नाचे उत्तर त्याने दिले आहे."

रत्नावली म्हणाली, "छे, तो तर एक शब्दही बोलला नाही अजूनपर्यंत."

"अग मूढे, त्याने तुला अंगठा दाखविला ते तू पाहिले नाहीस काय?"

"पाहिले तर! पण त्याचे उत्तर..."

"तेच त्याचे उत्तर. ब्रह्म एकच आहे. ते सर्वश्रेष्ठ आहे असे त्याने सुचविले. आणि शब्दात व्यक्त न करता केवळ खुणेने सुचविले. कारण त्याचे व्रत चालू आहे. ते पूर्ण होईपर्यंत तो मौनसाधना करीत आहे."

हे ऐकताच रत्नावलीला त्याच्याबद्दल आदर वाटू लागला. तरीही लगेच तिने त्याला पुढचा प्रश्न विचारला.

"प्रमुख धर्मतत्वे कोणती?"

या प्रश्नाचा तर मुळीसुद्धा अर्थ त्या गरीब माणसाच्या लक्षांत आला नाही. "काय उगीचच मला भलभलते प्रश्न विचारतेस?" असे भाव त्याच्या मुद्रेवर उमटले. मनापासून वैतागलेल्या त्याने तिला हाताचा पंजा दाखवला व एक देऊ का? अशा अर्थानं मूठ दाखवली.

तिने आपल्या वडिलांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. तत्काळ हसून त्यांनी सांगितले,

" अगं वेडे, पाच बोटे म्हणजे पंचमहाभूते व या सर्वांचे एकत्रित मूळ स्वरूप म्हणजेच चराचराचे नियमन करणारे ईश्वरी अधिष्ठान असेच त्याचे म्हणणे आहे. "

रत्नावली आता मात्र त्याच्याकडे मोठ्या आदराने पहात राहिली, श्रद्धेने लीन झाली व इतक्या महान ज्ञानवंताला आपण तिसरा प्रश्न तो काय विचारणार असा विचार करून ती लज्जावनत मुखाने बसून राहिली. तिची अट पूर्ण झाली होती. त्यामुळे रत्नावली आनंदली. तत्काळ विवाहाची सिद्धता होऊन रत्नावलीशी मोठ्या थाटामाटाने त्याचा विवाह झाला. सकाळपासून झाडावरून उतरल्यापासून निघालेली त्या बिचाऱ्याची वरात त्या खऱ्याखुऱ्या लग्न समारंभानंतर संपन्न झाली. तहान भुकेने व्याकुळ झालेल्या नवरदेवाला त्याच्या खोलीत पाठवले गेले. तिथे येताच अंगावरचा सर्व भरजरी पोशाख भराभर उतरून उघड्या अंगाने बसल्यावर त्याला हायसे वाटले. जरा इकडे तिकडे पाहिल्यावर त्याला एक सुंदर जलकुंभ एका कोपऱ्यात दिसला. झटकन तिथे जाऊन त्याने दोन्ही हातांनी तो उचलून गटागटा पाणी प्यायला सुरुवात केली.

तेवढ्यात आरतीचे तबक घेऊन रत्नावली आत आली. पहाते तो काय! असा रानवट अवतार! मनोमनी स्वत:च्या दैवाला तिने दोष दिला. आणि आपल्या पतीला उद्देशून तिने खूप वाक्ताडन केले. गरीब असला तरी तो स्वाभिमानी होता. त्याने तिच्यासमोर क्षमायाचना केली नाही. त्यामुळे अधिकच चिडलेल्या रत्नावलीने पतीला दूषणे देऊन लत्ताप्रहार करून सेवकांकडून हाकलून दिले.

आपल्या अपमानाने व्यथित होऊन दु:खी अंत:करणाने तो बिचारा निघाला. खूप चालल्यावर एके ठिकाणी त्याला कालिमातेचे मंदिर दिसले. तिथे त्याने देवीसमोर बसून खूप विलाप केला आणि मग देवीला म्हणाला.

" माते, का माझा असा अंत पहातेस. मी निर्बुद्ध म्हणून सगळ्या जगाने, प्रत्यक्ष माझ्या पत्नीनेसुद्धा माझी अवहेलनाच केली. आता मी तुझ्या पायाशी आलो आहे. तूच मला तार किंवा मार. तुझ्या कृपाप्रसादाशिवाय मी येथून कोठेही जाणार नाही. त्यापेक्षा मरणही आले

तरी बेहत्तर."

असे म्हणून रात्रंदिवस तो न खाता न पिता कालिमातेला आळवीत राहिला. तिची भक्ती करीत राहिला आणि खरोखरच चमत्कार घडला. कालिमातेने त्याला स्वप्नांत दर्शन दिले, त्याच्या मस्तकी आशीर्वादपूर्वक हात ठेवला आणि ती अंतर्धान पावली.

कालीमातेची उपासना करणारा म्हणून तो 'कालिदास' या नावाने आता ओळखला जाऊ लागला. एकदा तो नदीच्या घाटाकडे निघाला असताना नदीवरून स्नान करून येत असलेली सुस्नात ओलेती युवती त्याला पाठमोरी दिसली आणि त्याला काव्य स्फुरले. ते तो म्हणू लागला एवढ्यात त्या युवतीने मागे वळून पाहिले. तिने त्याला ओळखले. कारण ती त्याची बालपणाची सखी होती.

जवळ येऊन त्याची वास्तपुस्त तिने केली तेव्हा त्याने तिला सर्व कहाणी सांगितली. तिला फार आनंद झाला. ती त्याला घेऊन उज्जैनला आली. त्यानंतर कालिदासाची प्रतिभा फुलू लागली. त्रिखंडात त्याची कीर्ती पसरली.

असा हा कीर्तीसंपन्न पुरूष आहे तरी कोण हे पहाण्यासाठी रत्नावली उज्जयनीला आली आणि आपलाच पती इतका प्रतिभासंपन्न बुद्धिमान झाला हे पाहून तिला अत्यानंद झाला. मुद्दाम रत्नावलीलाही तेथे घेऊन येणारी स्त्री, जी मनोमनी कालिदासावर - त्याच्या पूर्वीच्या मूर्खतेवरही प्रीती करीत होती ती मात्र त्या उभयतांचे मीलन घडवून तेथून निघून गेली.

असे म्हणतात की यातूनच कालिदासाचे सुप्रसिद्ध मेघदूत जन्मले.

# २ । मेघदूत

कविकुलात श्रेष्ठ असलेल्या कालिदासाचे मेघदूत

कविकुलगुरू कालिदासाचे नाव ठाऊक नाही असा कुणी संस्कृतप्रेमी असेल का ? शक्यच नाही.


कालिदास कविकुलात श्रेष्ठ मानला गेला आहे. म्हणूनच त्याला 'कविकुलगुरू' असे अभिधान देण्यात आले. कालिदासाचे 'शाकुंतल' ही तर त्याची अजरामर कलाकृती. असे म्हणतात की 'शाकुंतल' वाचल्यावर अत्यंत आनंदित होऊन जर्मन कवी गटे हा बेहोश होऊन नाचला.

कालिदासाने लिहिलेले 'मेघदूत' हे चमत्कृतीजन्य असूनही विरही जनांना संतोष देणारे व आपल्या अनुपमेय अशा उपमा सौंदर्याने रसिकांना वेड लावणारे महाकाव्य ठरले.

अशा रसिकमान्यतेच्या शिखरावर स्थानापन्न झालेल्या मेघदूताची ही साध्या सोप्या भाषेत खास बालवाचकांसाठी म्हणून गुंफलेली काही पुष्पे.

## पूर्वमेघ

कुबेर - देवलोकाचा धनपती अशा या कुबेराच्या सौंदर्यसंपन्न अलका नगरीतील एका यक्षाने आपल्या धन्याच्या सेवेत काही कुचराई केली आणि ( स्वत:च्या प्रियेवर अपरंपार प्रीती असणाऱ्या ) त्या यक्षास, धन्याने दिलेली एक वर्षाच्या एकांतवासाची शिक्षा भोगणे क्रमप्राप्त झाले.



एक वर्ष एकांतवासाची ही कठोर शिक्षा भोगण्यासाठी, नाईलाजास्तव धन्याच्या शापामुळे निष्प्रभ झालेला तो यक्ष रामगिरीच्या आश्रमात येऊन राहिला.

सीतेच्या स्नानामुळे ज्या ठिकाणचे ( सीताकुंडातील ) उदक पवित्र झाले होते तसेच श्रीरामाच्या पदस्पर्शाने जो भूभाग पुनीत झाला होता, गर्द सावली असलेले मोठमोठे वृक्ष ज्या स्थळास सुशोभित करीत होते अशा रामगिरीच्या आश्रमात तो यक्ष राहू लागला.

स्वत:च्या प्रियेपासून व आप्तजनांपासून दुरावलेला तो यक्ष अत्यंत दु:खित अंत:करणाने, पश्चातापदग्ध होऊन एकेक दिवस कसाबसा व्यतीत करू लागला. प्रियाविरहाने अशक्त झालेल्या त्या यक्षाच्या हातातील सुवर्णकंकण त्याच्याही नकळत गळून पडल्याने त्याचे रिते मनगट अधिकच दुर्बल वाटत होते. असेच काही महिने गेले ऋतुचक्र स्वत:च्या गतीनुसार फिरतच होते. अशातच आषाढ महिना सुरू झाला आणि त्याच्या पहिल्याच दिवशी, यक्षाला एखाद्या बलशाली गजराजाप्रमाणे विलोभनीय दिसणारा एक मेघ पर्वतशिखराला बिलगून उभा असलेला दिसला.

प्रियतमेच्या वियोगाने असह्य यातना सोसणारा, स्वत:च्या अधिकाराने प्रमत्त झाल्याने धन्याचा शाप मिळाल्यावर निष्प्रभ झालेला व स्वत:च्या शोकाकुल मनासाठी अभिशाप मिळवू इच्छिणारा तो यक्ष... त्या सुंदर घननीळाला आपल्या सामोरा पाहून गहिवरला. मेघाला पाहिले की सामान्यांच्या मनातही प्रियामीलनाची इच्छा उत्पन्न होते. मग या

विरही यक्षाची काय कथा सांगावी ?

मेघाला पाहून विरहोत्कंठित अशा त्या यक्षाला एक अत्यंत रमणीय अशी कल्पना सुचली. याच मेघाला उत्तराभिमुख करून कैलास पर्वताच्या कुशीत वसलेल्या अलकानगरीत आपल्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या आपल्या प्रियेला आपला निरोप देण्यासाठी दूत म्हणून पाठवावे अशा विचाराने तो यक्ष मोठ्या आशेने त्या मेघाकडे पाहू लागला.

खरं म्हणजे मेघ म्हणजे काही कुणी कार्यक्षम इंद्रिये असलेला सजीव प्राणी नव्हे.

मेघ म्हणजे तर धूर, अग्नि, जल आणि वायू यांचा एक समूह आणि संदेश द्यायचा तर तो कार्यक्षम इंद्रिये असणाऱ्या प्राण्याकडूनच देता येतो. या दोन गोष्टींचा मेळ तरी कसा काय घालता येणार ? पण म्हणतात ना.... "**प्रेमवेडे हे मुळातच दुबळे व चेतन आणि अचेतन यांच्यातला फरक जाणण्याच्या बाबतीत कमकुवत असतात.**"

अर्थातच यक्ष देखील या उक्तीला अपवाद मुळीच नव्हता. अवचित दारी आलेल्या आपल्या जीवाभावाच्या मित्राप्रमाणे त्याने मेघाचे स्वागत करण्याचे ठरविले.

श्रावण महिना जवळ आलेला होता. त्यामुळे वातावरण प्रसन्न आणि उल्हासित होत होते. विविध गंधांची विशेषत: रानजाईची फुले घेऊन त्याने मेघाची पूजा केली व संतुष्ट मनाने व प्रीतीभरल्या शब्दांनी यक्षाने मेघाचे मन:पूर्वक स्वागत केले.

मेघाचे मन:पूर्वक स्वागत करून यक्ष म्हणाला, " हे मेघा, त्रिभुवनात ज्या कुलाचे नाव - महिमा गाजत आहे, त्या पुष्कर आणि आवर्तक कुळात तुझा जन्म झाला आहे. तसेच इच्छेनुरूप रुप धारण करणारा असा तू प्रत्यक्ष देवाधिदेव इंद्राचा प्रमुख सचिव आहेस हे देखील मी जाणून आहे.

आणि म्हणूनच तुझ्यासारख्या थोराची याचना मी करीत आहे. दुर्दैवाने माझ्या प्रियेपासून माझी ताटातूट झाली असली तरी याचनाच

करायची तर ती योग्य अयोग्य याचा विचार करूनच केलेली अधिक लाभप्रद ठरेल. **योग्य व्यक्तीकडे केलेली याचना विफल झाली तरी परवडली पण अधमाला ती करून असफल होणे नको.''**

एवढेच सांगून तो यक्ष थांबला नाही तर तो पुढे म्हणाला, ''मेघा माझ्यासारख्या पोळलेल्या जीवांचा. तू मोठाच आसरा आहेस तेव्हा माझे स्वामी धनपती कुबेर यांच्या क्रोधाला बळी पडून. आज विरहावस्थेत तडफडणाऱ्या माझ्या प्रियेकडे माझा निरोप पोचता कर.

मित्रा, कुबेराच्या अलका नगरीत तुला जावयाचे असून ही नगरी श्रीचंद्रशेखराच्या ( शंकराच्या ) मस्तकावरील चंद्रकलेमुळे अत्यंत सुशोभित व उज्ज्वल अशा भवनांनी युक्त आहे.

तुझ्या संचाराने मार्गातील सुंदर स्त्रिया केसांच्या बटा सावरीत मोठ्या आशेने तुझ्याकडे पहातील. मात्र कुठेही फारसा वेळ न घालवता तू झटपट माझ्या प्रियेकडे जा. माझ्यावर एकनिष्ठ भक्ती करणारी, प्रीती करणारी तुझी वहिनी एक एक दिवस मोजीत पण सुखरूप अशी दिसेल. कारण —

स्त्रियांचे कुसुमकोमल असे हृदय कोणत्याही क्षणी खचून जाऊ शकते. पण विरहात मात्र आशेचा कोमल बिसतंतुच त्या हृदयाला चिवटपणे सावरून धरतो. असो.

तू मार्गस्थ असताना वाटेत तुला सुख देण्यासाठी वारा मंद मंद वहात असेल तर चातकपक्षी मधूर कुजीत आळवील. तुला नेत्रसुख देणारे बगळे तुझ्याभोवती आकाशात सुंदर माळ करतील मानस सरोवराकडे निघालेले राजहंस कैलास पर्वतापर्यंत तुला सोबत करतील.

तेव्हा आता तुझ्या या जिवलग गिरीमित्राचा आलिंगन देऊन निरोप घे. प्रत्यक्ष श्रीरामाची पदचिन्हे या डोंगरउतरणीवर उमटली आहेत. प्रत्येक वर्षा ऋतूत तुझ्या मित्राशी तुझी भेट होते. पण दीर्घकालीन वियोगामुळे उष्ण असे अश्रू तुझ्या प्रेमाचा प्रत्यय आणून देतात.

मेघा, तुला तुझ्या प्रयाणाचा मार्ग आता सांगतो. त्या सर्वात अनुकूल मार्गानेच तू नीघ. नंतर माझा सुंदर असा संदेश नीट लक्षपूर्वक

ऐक. प्रवास करून खूपच थकलास तर पर्वतांवर विसावा घे. कृश झालास तर नद्यांचे पाणी हळुवारपणे पी आणि मगच पुढे जा.

तुझी उत्साही मुद्रा सिद्धांच्या अल्लड स्त्रिया पाहतील पण तसाच तू, जिथे पुष्कळ ओले वेत आहेत, अशा ठिकाणाहून उत्तरेकडे वळून मार्गात येणाऱ्या बलवान दिग्गजांच्या सोंडेचे प्रहार चुकवीत आकाशात झेप घे.

मोहक दिसणाऱ्या इंद्रधनुष्यामुळे तुझे सावळे रुपडे अधिकच सुंदर भासेल.

येथून माल पठारावरून झेपावून थोडासा पश्चिमेकडे वळ आणि पुन्हा वेगाने उत्तरेकडे जा.

प्रवासाचा शीण नाहीसा होण्यासाठी आम्रकूट पर्वतावर तू विश्रांती घे कारण,

**मित्र आश्रयासाठी आला तर क्षुद्र मनुष्यसुद्धा उपकारांची जाणीव ठेवून कृतज्ञतेने, मित्राच्या बाबतीत कधीच उदासीन राहत नाही,** मग आम्रकूटासारख्या थोरांच्या बाबतीत काय बोलावे?

आम्रफलांनी वाकलेल्या आम्रवृक्षांनी जो झाकून गेला आहे. तो आम्रकूट पर्वत काळसर वर्ण असलेला तू, त्याच्या शिखरावर आरूढ झाल्यामुये अधिकच सुंदर दिसेल. खरोखरच देवांनी ही आपल्या पत्नीसमवेत पाहण्यासारखी अशी ती दृष्यमाला असेल.

आम्रकूटावर जलवर्षाव केल्यामुळे हल्का झालेला तू वेगवान होऊन पलिकडचा मार्ग ओलांडून नर्मदा नदीला भेट, मात्र नर्मदेचे पाणी प्याल्याशिवाय तू पुढे जाऊ नकोस. कारण, **जो जो रिक्त असतो तो क्षुद्र ठरतो. तर परिपूर्णतेमुळे गौरवाला पात्र ठरतो.**

कदंबाची फुले, हरणे, दशार्ण देशातील उद्याने तुला विदिशा नगरीत घेऊन जातील. विदिशा नगरीत मोहक वेत्रवती नदीचे जल प्राशन कर आणि विलासी जीवनाचे परिपूर्ण फळ मिळव. कारण दशार्ण देशाची राजधानी असलेली ही विदिशा नगरी विलासात अतिविख्यात आहे.

करायची तर ती योग्य अयोग्य याचा विचार करूनच केलेली अधिक लाभप्रद ठरेल. **योग्य व्यक्तीकडे केलेली याचना विफल झाली तरी परवडली पण अधमाला ती करून असफल होणे नको."**

एवढेच सांगून तो यक्ष थांबला नाही तर तो पुढे म्हणाला, "मेघा माझ्यासारख्या पोळलेल्या जीवांचा. तू मोठाच आसरा आहेस तेव्हा माझे स्वामी धनपती कुबेर यांच्या क्रोधाला बळी पडून. आज विरहावस्थेत तडफडणाऱ्या माझ्या प्रियेकडे माझा निरोप पोचता कर.

मित्रा, कुबेराच्या अलका नगरीत तुला जावयाचे असून ही नगरी श्रीचंद्रशेखराच्या ( शंकराच्या ) मस्तकावरील चंद्रकलेमुळे अत्यंत सुशोभित व उज्ज्वल अशा भवनांनी युक्त आहे.

तुझ्या संचाराने मार्गातील सुंदर स्त्रिया केसांच्या बटा सावरीत मोठ्या आशेने तुझ्याकडे पहातील. मात्र कुठेही फारसा वेळ न घालवता तू झटपट माझ्या प्रियेकडे जा. माझ्यावर एकनिष्ठ भक्ती करणारी, प्रीती करणारी तुझी वहिनी एक एक दिवस मोजीत पण सुखरूप अशी दिसेल. कारण —

स्त्रियांचे कुसुमकोमल असे हृदय कोणत्याही क्षणी खचून जाऊ शकते. पण विरहात मात्र आशेचा कोमल बिसतंतुच त्या हृदयाला चिवटपणे सावरून धरतो. असो.

तू मार्गस्थ असताना वाटेत तुला सुख देण्यासाठी वारा मंद मंद वहात असेल तर चातकपक्षी मधूर कुजीत आळवील. तुला नेत्रसुख देणारे बगळे तुझ्याभोवती आकाशात सुंदर माळ करतील मानस सरोवराकडे निघालेले राजहंस कैलास पर्वतापर्यंत तुला सोबत करतील.

तेव्हा आता तुझ्या या जिवलग गिरीमित्राचा आलिंगन देऊन निरोप घे. प्रत्यक्ष श्रीरामाची पदचिन्हे या डोंगरउतरणीवर उमटली आहेत. प्रत्येक वर्षा ऋतूत तुझ्या मित्राशी तुझी भेट होते. पण दीर्घकालीन वियोगामुळे उष्ण असे अश्रू तुझ्या प्रेमाचा प्रत्यय आणून देतात.

मेघा, तुला तुझ्या प्रयाणाचा मार्ग आता सांगतो. त्या सर्वात अनुकूल मार्गानेच तू नीघ. नंतर माझा सुंदर असा संदेश नीट लक्षपूर्वक

ऐक. प्रवास करून खूपच थकलास तर पर्वतांवर विसावा घे. कृश झालास तर नद्यांचे पाणी हळुवारपणे पी आणि मगच पुढे जा.

तुझी उत्साही मुद्रा सिद्धांच्या अल्लड स्त्रिया पाहतील पण तसाच तू, जिथे पुष्कळ ओले वेत आहेत, अशा ठिकाणाहून उत्तरेकडे वळून मार्गात येणाऱ्या बलवान दिग्गजांच्या सोंडेचे प्रहार चुकवीत आकाशात झेप घे.

मोहक दिसणाऱ्या इंद्रधनुष्यामुळे तुझे सावळे रुपडे अधिकच सुंदर भासेल.

येथून माल पठारावरून झेपावून थोडासा पश्चिमेकडे वळ आणि पुन्हा वेगाने उत्तरेकडे जा.

प्रवासाचा शीण नाहीसा होण्यासाठी आम्रकूट पर्वतावर तू विश्रांती घे कारण,

**मित्र आश्रयासाठी आला तर क्षुद्र मनुष्यसुद्धा उपकारांची जाणीव ठेवून कृतज्ञतेने, मित्राच्या बाबतीत कधीच उदासीन राहत नाही,** मग आम्रकूटासारख्या थोरांच्या बाबतीत काय बोलावे?

आम्रफलांनी वाकलेल्या आम्रवृक्षांनी जो झाकून गेला आहे. तो आम्रकूट पर्वत काळसर वर्ण असलेला तू, त्याच्या शिखरावर आरूढ झाल्यामुये अधिकच सुंदर दिसेल. खरोखरच देवांनी ही आपल्या पत्नीसमवेत पाहण्यासारखी अशी ती दृष्यमाला असेल.

आम्रकूटावर जलवर्षाव केल्यामुळे हलका झालेला तू वेगवान होऊन पलिकडचा मार्ग ओलांडून नर्मदा नदीला भेट, मात्र नर्मदेचे पाणी प्याल्याशिवाय तू पुढे जाऊ नकोस. कारण, **जो जो रिक्त असतो तो क्षुद्र ठरतो. तर परिपूर्णतेमुळे गौरवाला पात्र ठरतो.**

कदंबाची फुले, हरणे, दशार्ण देशातील उद्याने तुला विदिशा नगरीत घेऊन जातील. विदिशा नगरीत मोहक वेत्रवती नदीचे जल प्राशन कर आणि विलासी जीवनाचे परिपूर्ण फळ मिळव. कारण दशार्ण देशाची राजधानी असलेली ही विदिशा नगरी विलासात अतिविख्यात आहे.

त्यानंतर विश्रांतीसाठी तू 'नीचैस' पर्वतावर वास्तव्य कर. मात्र उत्तरेकडे जाताना थोडी वाकडी वाट करून का होईना तू प्रसिद्ध उज्जयनी नगरीचा परिचय करून घेण्यास विसरू नकोस.

वाटेत खाली येऊन, खडकांवर मोहक लोळण घेतल्यामुळे भोवरारूपी नाभीचे दर्शन घडविणाऱ्या निर्विघ्या नदीच्या जलाचा तू आस्वाद घे. कारण,.

आपल्या प्रियकरांशी प्रेमाची पहिली वहिली वचने स्त्रिया आपल्या विभ्रमांतूनच बोलतात.

निर्विध्येला ओलांडल्यावर आपल्या विरह व्यथेने तुझे थोर भाग्य दर्शवणारी सिंधू नदी तुझे स्वागत करील. तिचाही तू अव्हेर न करता मन:पूर्वक स्वीकार कर. तुझ्यासारख्या स्नेहार्द्र दयाघनाला तेच शोभेल.

वत्सराज उदयनाच्या सुप्रसिद्ध अवंतिकेत गेल्यावर वैभवसंपन्न अशा उज्जयनीला तू अवश्य जा. स्वर्गसमान सुखकर व सौंदर्यसपन्न म्हणून ही उज्जयनी विख्यात आहे. तेथील क्षिप्रा नदी, तिच्यावरून वहाणारा सुखदायी वारा, उज्जयनीतील बाजार, मौल्यवान रत्ने, हिरे, मौक्तिके, मरकत रत्ने, पोवळी इत्यादी पाहून सागरात आता फक्त पाणीच उरले आहे की काय असे तुला वाटेल. उज्जयनीतील सुंदर भवने, तेथील लावण्यलतिका, त्यांचे विभ्रम, इत्यादी शोभा पाहून तू प्रवासाचा शीण घालव व मग महांकालाचे दर्शन घेण्यासाठी जा. मात्र सूर्य अस्ताला जाताना तेथेच थांबून घनगंभीर गर्जनेने मृदंगवादनाचे कार्य करून त्याची फलप्राप्ती अवश्य करून घे. ती तुला होईलच.

तुझ्यासमवेत दीर्घकाल विलासामुळे श्रांत झालेली तुझी पत्नी विद्युल्लता हिला घेऊन एखाद्या भवनाच्या छपरावर सुखनैव रात्र घालव. मात्र सूर्योदय होताच लगेच उरलेल्या मार्गक्रमणास सिद्ध होऊन वाटचाल सुरू कर. कारण ——

**मित्रकार्य मनापासून स्वीकारणारे लोक कधीच त्या कार्यात मंदपणा दाखवत नाहीत. किंवा चालढकल करत नाहीत.**

पुढे निघाल्यावर प्रसन्न अंत:करणाची निर्मळ अशी गंभीरा नदी

तुला सामोरी येईल. तिचे कटाक्ष तू विफल न करता तिच्या सादेला तू प्रतिसाद दे. तिच्यानंतर चर्मण्वती ओलांडून ब्रह्मावर्तात प्रवेश कर आणि तुझा अंतरात्मा निर्मळ करणाऱ्या सरस्वती नदीचे जलप्राशन कर. तेथून कनखल क्षेत्राजवळ हिमाचलातून खाली उतरलेल्या जान्हवीला भेट.

हिमालयावर शिखराला टेकून विश्रांती घेताना जर त्या पर्वताला वणवा त्रास देताना दिसला तर हजारो जलधारांनी तू तो वणवा पूर्णपणे विझवून टाक कारण —

**आपत्तीत सापडलेल्यांच्या दु:खांचा परिहार करणे हेच थोरांच्या ऐश्वर्याचे प्रयोजन असते.**

त्यानंतर श्रीशंकरांच्या पदचिन्हांना भक्तिभावनेने नम्र होऊन तू प्रदक्षिणा घाल. तुझ्या गर्जनेने मृदंगाची साथ दे व शंकराची संगीताची सामग्री पूर्णत्वाप्रत ने.

हिमालयाच्या उतरणीवरून परशुरामाची यशोगाथा गाणाऱ्या क्रौंचरंध्रांतून तू उत्तरेकडे झेप घे. पुढे गेल्यावर देवांगनाचा आरसा मानल्या जाणाऱ्या कैलास पर्वताचा पाहुणचार तू घे.

कैलासाच्या उतरणीवर - त्या क्रिडापर्वतावर शंकराने हात दिलेली गौरी पार्वती जर पायी चालू लागली तर तुझ्या आतील जलसंचय घट करून व लाटांप्रमाणे शरीराकार करून तू या उतरणीवरून चढण्यासाठी तिला, पायऱ्यांप्रमाणे सोपान होऊन उपयोगी पड.

कैलासावरील देवांगनापासून लवकर सुटका करून घे व मग सुवर्णकमलांची निर्मिती ज्यात होते त्या मानसरोवराचे जल प्राशन कर. विविध प्रकारांनी त्या पर्वताचा उपभोग घे.

त्याच कैलासाच्या वरच्या बाजूला असलेली उत्तुंग प्रासाद असलेली व गंगेचे वस्त्र ल्यायलेली अतिसुंदर अशी, धनपती कुबेराची अलकानगरी तू तात्काळ ओळखशील."



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
५
सौ. मनीषा बर्वे यांनी देणगी दिलेले पुस्तक.

## उत्तरमेघ

ती सौंदर्यवती अल्कानगरी पहाताक्षणीच तू सहजं ओळखशील. ती सर्व प्रकारच्या सुखोपभोगांनी युक्त व वैभवसंपन्न असलेली अलकानगरी अनेक सुंदर तरुण अभिसारिकांनी, रसिक यक्ष किन्नरांनी, गगनचुंबी प्रासादानी, दु:खाची किंवा व्यथांची सावलीसुद्धा जिथे पडत नाही अशी कधीही न मावळणाऱ्या चांदण्याने रमणीय झालेली दिसेल. अनेकविध प्रकारच्या फुलांनी ( उदा. लीलाकमल, कुंदफुले, कुरबकाची फुले, कदंब कुसुम, इत्यादी ) सारा परिसर सुगंधीत झालेला असेल.

हे माझ्या प्रिय मित्रा मेघा, इथल्या सुंदर कन्यका मुठीत रत्ने घेऊन सुवर्णाच्या वाळूत ती दडवण्याचा खेळ खेळत असतील. ( कधीही कमी न होणारे धनाचे साठे असलेली ), अक्षय कोषागार असलेली, कितीतरी उत्तुंग भवने व त्यात अप्सरांच्या सान्निध्यात रमणारे विलासी पुरूष तुला येथे आढळतील.

' वैभ्राज ' नावाचं क्रीडा उद्यानही नगराबाहेर तुला दिसेल, रावणाच्या ' चंद्रहास ' खड्गामुळे झालेल्या जखमांचे व्रण आपल्या शरीरावर धारण करणारे पराक्रमी व धैर्यवान वीरश्रेष्ठही तुला अलका नगरीत आढळतील.

येथे शिवाचे साक्षात वास्तव्य आहे. हे ठाऊक असल्याने मदन येथे स्वत:हून आपले शरसंधान करीत नाही. पण सुंदर व चतुर वनितांचे भ्रूविलासच मदनाचे कार्य उरकून टाकतात.

त्या अलका नगरीत कुबेराच्या प्रासादाच्या उत्तरेला आमचे घर आहे. जे इंद्रधनुष्याप्रमाणे सुंदर अशा कमानीमुळे दुरूनसुद्धा सहज दिसते. आमच्या घराच्या बागेत माझ्या पत्नीने पुत्रवत् वाढवलेले मंदाराचे एक कोवळे झाड आहे. हातानी सहज तोडता येतील अशा पुष्पगुच्छांनी ते वाकलेले आहे.

जवळच पाचूच्या पायऱ्यांनी युक्त अशी व वैडुर्याचे देठ असलेल्या सुवर्णकमलांनी भरलेली, आणि अत्यंत सुखात विहरणाऱ्या हंसांनी युक्त अशी नयनमनोहर पुष्करणी आहे.

त्या पुष्करणीच्या तीरावर इंद्रनील मण्यांचे शिखर असलेला व

सुवर्णकर्दलीच्या वनाने आकर्षक बनलेला, माझ्या पत्नीला प्रिय असलेला असा क्रीडापर्वत आहे. मी अधीर मनाने पत्नीबरोबर त्याचीच आठवण करतो.

त्या घरात विधात्याने अत्यंत कलात्मकरित्या निर्माण केलेली जणू पहिलीच सौंदर्यवती स्त्री-सुकुमार युवती तुला दिसेल.

विरहव्यथेमुळे म्लान झालेल्या कमलिनीप्रमाणे दिसणारी, मेघाच्छादित चंद्राप्रमाणे दीनवाणे मुखकमल झालेली अशी ती माझी भार्या तुला दिसेल.

माधवी लतेच्या कुंजाजवळ असलेला रक्त अशोक भरभरून फुलण्यासाठी माझ्या सखीच्या डाव्या चरणस्पर्शाची अभिलाषा करतो तर कमनीय केसर वृक्ष अभिलाषापूर्तीसाठी माझ्या समवेत तिच्या मुखातील मदिरेची अपेक्षा करतो.

त्या दोन वृक्षांच्या मध्ये स्फटिक फलक असलेली सोन्याची दांडी आहे. त्यावर हे मेघा, तुझा मित्र असलेला मोर माझ्या पत्नीच्या शिकवणीनुसार तालावर नृत्य करतो व थकल्यावर त्या सोन्याच्या दांडीवर विसावा घेतो.

हे माझ्या मित्रवर्या, माझ्या अनुपस्थितीमुळे कोमेजलेले ते आमचे घर तू शोधून काढ.

तेथे तू लहान आकार धारण करून डोकावलास की पूजेत मग्न असलेली माझी प्रिया तुला दिसेल. मंजुळ बोलणाऱ्या पिंजऱ्यातील सारिकेला 'तुला तुझ्या (मालकाची) स्वामीची आठवण होते का? तू तर त्यांची आवडती होतीस!' असे ती विचारीत असेल. किंवा माझेच कल्पनेत दिसलेले चित्र रेखाटत असेल. कदाचित वीणा घेऊन माझे नाव असलेले गीत गाण्याच्या प्रयत्न करीत असेल. पण दु:खामुळे स्वत:च रचलेली गाणी सुद्धा ती पुन्हा विसरत असेल.

विरहाचा उर्वरीत कालावधी ती उंबऱ्यावर फुले ठेवून मोजत असेल किंवा कल्पनेतच माझ्या भेटीचा आनंद मिळवण्याचा प्रयत्न करीत असेल.

सामान्यपणे विरह कालात मनाला विरंगुळा म्हणून स्त्रिया ह्याच उपायांचा अवलंब करतात.

मित्रा, दिवसभर उद्योगात गुंतल्यामुळे विरह तिला फार त्रासदायक वाटणार नाही पण माझ्या सहवासात क्षणाप्रमाणे संपणारी रात्र मात्र माझ्या वियोगामुळे तिला युगायुगाप्रमाणे दीर्घ वाटेल. माझ्या विरहामुळे स्वत:च्या देहाची फारशी काळजी न घेणारी माझी प्रिया तुला दु:खाने म्लान झालेल्या कमलिनीप्रमाणे दिसेल. तिच्याकडे पाहून तुलाही नवजलरूपी अश्रुपात करावासा वाटेल.

तू तेथे जाताच तिला अनेक शुभशकुन होऊ लागतील. मात्र निद्रेत तिला चुकून माझ्या काल्पनिक सहवासाचे सुख लाभत असेल तर मात्र तू थोडा थांब. त्यात व्यत्यय आणू नकोस.

काही काळानंतर जाईच्या सुगंधाने युक्त अशा व तुझ्या जलबिंदूंनी शीतल झालेल्या वस्त्राने तिला जागृत कर आणि मग धीरगंभीर शब्दात माझा निरोप तिला सांग, "हे सुभगे, मी तुझ्या पतीचा मित्र मेघ आहे. विरही जनांना मी संतोष देतो." तू इतके बोललास की ती प्रफुल्लित चित्ताने उत्सुकतेने तुझ्याकडे पाहील व अशोकवनात सीतेने मारुतीचा जसा सत्कार केला तसाच ती तुझाही सत्कार करील व तुझे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागेल —

कारण हे सौम्य मेघा, आपल्या प्रियकराची त्याच्या मित्राने आणलेली वार्ता जवळ जवळ प्रियकराच्या भेटी इतकीच स्त्रियांना सौख्यप्रद भासते. तरीही प्रियकराची प्रत्यक्ष भेट व त्याच्याबद्दलची मित्राने आणलेली वार्ता यात फारच मोठी उणीव स्त्रियांना जाणवते.

यानंतर मित्रा तू तिला सांग. 'रामगिरीच्या आश्रमात तुझा प्रियकर सकुशल आहे आणि तुझ्यावाचून दुरावलेला तो (तुझा प्रियकर) तुझे क्षेमकुशल विचारीत आहे.

संकटे ज्याच्यावर सहजी कोसळतात अशा दुर्दैवी माणसांनी तरी हेच प्रथम विचारले पाहिजे व दु:खभार हलका करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुढे तू तिला माझ्या मन:स्थितीची कल्पना दे.

"तुझा प्रियकर जो दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकल्याने विरहव्यथा भोगत आहे तो केवळ कल्पनेतील तुझ्या भेटीच्या सुखातच आपली तहान भागवतो आहे आणि उत्कंठेने भारलेल्या शब्दांनी युक्त असा हा निरोप माझ्या मुखाने तुला कळवीत आहे.

"हे प्रिये, घाबरलेल्या हरिणीच्या नेत्रदर्शनाने मला तुझ्या कटाक्षांची आठवण होते. मोराच्या घनदाट पिसाऱ्यात तुझा केशकलाप दिसतो. नदीच्या नाजुक लहरीमध्ये तुझ्या भृकुटीविलास भासमान होतो. पण दुःख अशासाठी वाटतं की तुझे एकाच ठिकाणी एकत्रित झालेले या साऱ्यांचं सौंदर्य सादृश्य मात्र मला कोठेही दिसत नाही.

तुझे कृतकोपाने लाल झालेले मुखकमळ शिळेवर काढून तुझ्या चरणी मी नम्र झालो आहे असे चित्र काढावेसे वाटते. पण दुःखावेगाने अश्रुंचा पडदाच माझी दृष्टी अंधुक करतो. चित्रातील आपले मीलन सुद्धा दुष्ट दैव होऊ देत नाही.

हे प्रिये तुझ्या विरहाने रात्र संपता संपत नाही. तुझ्या वियोगाच्या व्यथेने माझे हृदय व्याकुळ व असहाय झाले आहे.

देवदाराच्या पानाना विलग करून त्यांच्यातून पाझरणाऱ्या चिकामुळे सुगंधित झालेले, दक्षिणेकडे वाहणारे हिमालयावरील वारे बहुदा तुझ्या शरीरास स्पर्शून आले असतील असे वाटल्यामुळे हे गुणिले मी त्यांना आलिंगनबद्ध करतो.

ह्या परिस्थितीचा खूप विचार करता करता मी स्वतःलाच धीर देतो. तेव्हा तू मुळीच घाबरू नकोस. सुख किंवा दुःख हे कधीच शाश्वत नसते. **परिस्थिती चाकाच्या अरीप्रमाणे खालीवर होतच असते.**

निद्रासुखातून जागृतीप्रत शेषशय्येवरून विष्णू उठल्यावर म्हणजेच कार्तिकशुद्ध एकादशीला माझा शाप संपेल. त्यानंतर शुभ्र चांदण्यारात्री आपण विरहकालामुळे उत्कट झालेल्या प्रत्येक इच्छेची परिपूर्ती करून तृप्त होऊ.

एक खुणेची गोष्ट सांगतो, म्हणजे मी सुखरूप असल्याबद्दल



3092 दिनांक 28/7/2017

तुझी खात्री पटेल.

"मागे एकदा तू माझ्यासह गाढ झोपलेली असता अचानक मोठ्याने रडत जागी झालीस. मी तुला पुन्हा पुन्हा विचारल्यावर शांत झाल्यावर तू तुझ्या स्वप्नात मी सवतीबरोबर रममाण झाल्याचे पाहिल्याबद्दल सांगितलेस." आता मात्र लोकापवादाकडे फारसे लक्ष देऊ नकोस.. विरहामुळे प्रेम लयाला जाते असे लोक उगीचच म्हणतात. खरे तर-

**"विरहामुळे प्रिय व्यक्तीविषयी अभिलाषा पराकोटीला पोचते आणि प्रेमाची उत्कटता वाढतच जाते."**

हे प्रियमित्रा, वरीलप्रमाणे सखीचे सांत्वन केल्यावर शिवाच्या नंदीने ज्याची शिखरे उकरली आहेत त्या कैलासावरून शक्य तितक्या लवकर परत फीर व तिचे कुशल वर्तमान तू मजसाठी घेऊन ये आणि माझे सुकोमल जीवन सावर.

हे मित्रा, सुभगा, माझे हे मित्रकार्य तू नक्की करायचे ठरवले आहेस ना ?'

चातकांनी विनवणी केली तर गर्जनेशिवाय तू त्यांना जल देऊन त्यांची इच्छापूर्ती करतोस. **थोरांचे ध्येय हे नेहमी याचकांची इच्छा पूर्ण करणे हेच असते.**

मित्रप्रेमामुळे किंवा दयेमुळे तुला उचित नसले तरीही माझे एवढे कार्य तू करच अशी मी तुला मनापासून विनंती करीत आहे.

वर्षाकाळामुळे लाभलेली समृद्धि धारण करून, तुझ्या इच्छेला येईल तेथे तू अवश्य संचार कर. माझा व माझ्या प्रियेचा जो दुर्दैवी वियोग झाला तसा तुझा विद्युल्लतेशी एक क्षणही वियोग न घडो.

●

# ३। विक्रमोर्वशीय

खूप खूप वर्षापूर्वीची गोष्ट आहे. पृथ्वीवर सर्वत्र आनंदी आनंद होता सर्वश्रेष्ठ असा पुरूषोत्तम, सोमवंशीय राजा पुरुरवा त्यावेळी पृथ्वीवर राज्य करीत होता अत्यंत निर्भय होऊन प्रजाजन आनंदाने आपापल्या नित्यकर्मात गुंतलेले होते. महापराक्रमी पुरुरवा महाराज हे स्वर्लोकीच्या इंद्रमहाराजांचे प्रिय मित्र होते वेळोवेळी अडीअडचणीला धावून जाऊन पुरुरवा महाराजांनी इंद्रमहाराजांना मदतीचा हात पुढे केला होता. संकटाशी मोठ्या धाडसाने सामना करुन आपल्या पराक्रमाच्या जोरावर इंद्रपददेखील अबाधित ठेवले होते. त्यामुळे इंद्र व पुरुरवा महाराज एकमेकांचे जिवलग बनले होते. पुरुरवा महाराजांचे त्यामुळे नेहमीच काहीना काही निमित्ताने स्वर्गात जाणे येणे होत असे.

त्या दिवशी सूर्यदेवाच्या राजमहालीचे काम संपवून पुरुरवा महाराज पृथ्वीलोकाकडे यावयास निघाले होते. रथ वेगाने मार्ग आक्रमित होता. एवढ्यात सुकोमल स्वरातील विलापांचे स्वर महाराजाच्या कानी पडले. महाराजांनी त्या विलापस्वराच्या अनुरोधाने सारथ्याला सांगून रथ वळवला. थोड्याच अंतरावर त्यांना दोन सौंदर्यवंती अप्सरा थांबलेल्या व विलाप करीत असलेल्या दिसल्या. त्यांच्याजवळ जाऊन महाराजांनी त्या कोण ? कोठल्या ? कोणते संकट त्यांच्यावर कोसळले ? इत्यादी विचारणा केली त्या अप्सरांना असे अधांतरी टाकून पळणाऱ्या केशी दैत्याकडे लक्ष जाताच राजाने दिव्य शक्तिने अभिमंत्रून एक बाण केशी दैत्यावर सोडला आणि त्या सुंदरींची संकटातून मुक्तता केली. त्या दोघींना आपल्या रथात बसवून घेऊन राजाने रथ देवेंद्राच्या राजधानीकडे वळवला देवेंद्राकडे त्या दोघींना सोडून राजा परत आला परंतु त्याचे चित्त मात्र त्यातील

एका अप्सरेत गुंतले होते. ती होती उर्वशी नारायण ऋषींनी आपल्या या मानस कन्येला देवेंद्राला अर्पण केली होती. तिचीही स्थिती राजासारखीच झाली होती आपल्या राजधानीत आल्यावर सुद्धा राजाला उर्वशीचाच ध्यास लागून राहिला होता. एकदा भरदुपारी नारीबागेत सखा माणवकासह राजा बसला होता. उर्वशीच्या प्राप्तीसाठी काय करावे हेच त्या दोघांना सुचत नव्हते. एवढ्यात एक भूर्जपत्र माणवका समोर टपकन पडले. त्यावर काही लेख लिहिले होते. ते भूर्जपत्र राजाच्या मनाचा अंदाज घेण्यासाठी आलेल्या अदृश्यरुपातील उर्वशीनेच तेथे टाकले होते. त्या प्रेमपत्राच्या नुसत्या दर्शनानेही राजा आनंदित झाला. जणू उर्वशीच भेटल्याचा आनंद त्याला त्यामुळे मिळाला होता. उर्वशीने विरहार्त अशा राजाला पाहून त्याच्या प्रेमाची खात्री पटल्यावर त्याच्यासमोर प्रगट व्हायचे ठरवले होते. त्याप्रमाणे उर्वशी व चित्रलेखा दोघी प्रगट झाल्या. राजाच्या आनंदाला पारावार उरला नाही. पण तेवढ्यात आकाशवाणी झाली व इंद्रसभेचे बोलावणे तातडीने आल्याचे कळल्याबरोबर उर्वशी व चित्रलेखेला लगेच स्वर्गारोहण करणे भाग पडले. पुन्हा राजा दु:खी झाला. माणवक ते पत्र राजाला द्यावे म्हणून शोधू लागला तर ते सापडेचना. उलट वाऱ्याने उडून ते भूर्जपत्र महाराणीच्या समोर जाऊन पडले. निपुणिकेने ते वाचले व महाराणींना सांगितले. महाराणींना काही दिवसांपासून अशी शंका येतच होती. लगेच राणीसाहेब नारीबागेकडे निघाल्या. कारण महाराज तिथेच असणार याची त्यांना खात्री होती. तेथे गेल्यावर अपेक्षेनुसार त्यांना तेथे महाराज व माणवक दिसले. माणवक पत्र शोधत आहे हे लक्षात येताच महाराणी पुढे झाल्या व त्यांनी ते पत्र महाराजांना दाखवून खूप वात्ताडन केले. अर्थातच सभ्यतेच्या सर्व मर्यादा सांभाळूनच आणि लगेच महाराजांचे काहीही न ऐकता त्या तेथून निघून गेल्या.

देवेन्द्राच्या आज्ञेनुसार घाईघाईने परतलेल्या उर्वशीला तात्काळ भरतमुनीच्या लक्ष्मी स्वयंवर या नाटकात लक्ष्मीची भूमिका करावयाची होती. नाटक सुरू झाले. स्वयंवर प्रसंगी लक्ष्मी "मला पुरुषोत्तम हाच सर्वश्रेष्ठ वर आहे म्हणून मी त्यालाच वरणार" असे म्हणणार होती.

पण ते बोलताना उर्वशी पुरुषोत्तम ऐवजी पुरुवा असे म्हणाली. तिच्या मनात पुरुव्याशिवाय अन्य कोणताही विचार नसल्याने मनातला विचार आपोआप तिच्या ओठांवर आला. पण त्यामुळे समारंभाचा विचका झाला. नाट्याचार्य भरतमुनी रागावले व त्यांनी उर्वशीला "स्वर्गभ्रष्ट होशील" असा शाप दिला. चिरंजीव देवांगनेला शाप मरणापेक्षाही भयंकर वाटला असता. शेवटी देवेन्द्राने तिला उःशाप दिला. पुरूरव्याबरोबर पृथ्वीवर तोपर्यंत राहण्याची परवानगी तिला मिळाली की जो पर्यंत उर्वशीला पुरूरव्यापासून होणारा पुत्र, पुरूरवा पाहणार नाही. याचाच अर्थ तिच्या पुत्राचे मुखदर्शन पित्याला झाल्याबरोबर उर्वशीला स्वर्गात परतावे लागणार होते. ही अटही उर्वशीला त्रासदायक, दु:खदायकच वाटली. पण पुरूरव्याच्या सहवाससुखाच्या कल्पनेने आनंदून ती चित्रलेखेसह पृथ्वीतलावर प्रतिष्ठान नगराकडे निघाली. प्रतिष्ठान नगरीच्या सौधावर महाराणी त्यांचे प्रियातप्रसादन व्रताची सांगता करण्यासाठी आल्या होत्या. पतीच्या सुखातच पत्नीचे सुख हे जाणून मोठ्या मनाने त्यांनी उर्वशी व पुरूरवा महाराजांच्या मिलनाच्या इच्छेची पुन्हा उच्चारणा केली व याच प्रार्थनेने आपल्या व्रताची सांगता करून महाराणी तेथून परत महाली परतल्या.

उर्वशीला महाराणींबद्दल खूप आदर वाटला. उर्वशी तेथे प्रकट झाली. चित्रलेखेने उर्वशीला पुरूरव्याच्या हाती सोपवून शुभचिंतन केले व ती परत स्वर्गारोहण करून निघून गेली.

उर्वशी व पुरूरव्याचे मीलन तर झाले परंतु दिवसभर राजकार्यात बुडालेला पुरूरवा उर्वशीच्या वाट्याला दिवसा जवळजवळ येतच नसे. त्यामुळे उर्वशी नाराज झाली. शेवटी विलासासाठी गंधमादन पर्वतावर जावयाच्या बेतास तिने मोठ्या कुशलतेने राजाची परवानगी मिळवली. राजाने राण्यांची व्यवस्था मंत्र्यांकडे सोपवून उर्वशीसह गंधमादनाकडे प्रयाण केले.

या गंधमादन पर्वताच्या एका भागात कुमार कार्तिकेय तप करीत होता. त्यात कोणताही विक्षेप नको म्हणून कुमाराने ती, भूमी मंत्राने प्रभावित करून ठेवली होती. त्याला तेथे शांतता हवी होती. म्हणून

कोणी तेथे प्रवेश केल्यास त्याचे रुपांतर वेलीत होईल अशी शक्ती तेथे निर्माण केलेली होती.

एकदा उर्वशी व पुरूरवा शृंगारात मग्न असताना एक विद्याधरकन्या उदयवती राजाच्या नजरेस पडली. राजाला हल्ली अपत्य सुखाची खूप ओढ लागलेली असल्याने तो वात्सल्याने त्या कन्यकेकडे पहात राहिला. राजाचे लक्ष आपल्याकडे नसून राजा त्या सुंदर बालिकेकडे पहात आहे हे उर्वशीच्या लक्षात आले. बहुधा त्या कन्येचे भावी काळातील सौंदर्यपान राजा कल्पनेने करीत आहे असे वाटून ती राजावर रागावली. राजाच्या नकळत ती तेथून उठून रागारागाने निघून गेली. पण चुकून चालता चालता तिचे पाऊल कुमारभूमीच्या सीमारेषेवर पडले आणि तत्क्षणी तिचे रूपांतर फळे, फुले नसलेल्या बापुडवाण्या वेलीत झाले.

खेळणारी विद्याधरकन्या खेळ संपल्यामुळे तेथून निघाली आणि राजा इकडे तिकडे पाहू लागला तर काय! उर्वशी कोठेच दिसेना. तिचा शोध घेत घेत पुरूरवा वेड्यासारखा रानावनात हिंडू लागला. उन्हाळा संपला. पावसाळा आला तरी लतावेलींना, फुलापानांना, पशुपक्ष्यांना "कुठे आहे ती माझी उर्वशी?" असा केविलवाणा प्रश्न विचारत पुरूरवा भटकतच होता. शेवटी जगन्माता उमेला पुरूरव्याची दया आली. त्याची विरहवेदना तिने जाणली व स्वत:च्या पायाच्या अलित्यापासून बनवलेले रत्न त्याच्या मार्गात टाकले. आकाशवाणीच्या द्वारे घडलेला प्रकार राजाला कळविला तेव्हा ते रत्न हाती धरून राजाने आकाशवाणीने निर्देशिलेल्या वेलीला स्पर्श केला, त्याबरोबर त्या वेलीचे रुपांतर उर्वशीत झाले. उर्वशीला आता पश्चात्ताप झाला होता. तिने राजाची क्षमा मागितली. स्वत:च्या मंत्रसामर्थ्याने एका मोठ्या ढगाचे सुंदर वेगवान विमानात रुपांतर करून उर्वशीने राजाला घेऊन प्रतिष्ठान नगराकडे विमान वळवले. क्षणातच विमान प्रतिष्ठान नगराच्या सौधावर जाऊन पोहोचले.

उर्वशीला थोड्याच काळात एका नव्या चिंतेने घेरले. ती माता होणार होती. पती की पुत्र या संघर्षात तिचे मन अडकले. अखेर पतीप्रेम सरस ठरले. संधीची वाट पहाणाऱ्या उर्वशीला हवी तशी सुटकेची

संधी मिळाली. त्या संधीचा तिने तात्काळ उपयोग करून घेतला. नैमिषारण्यातील ऋषींनी यज्ञ आरंभला. त्याचे यजमानपद पुरूरव्याकडे आले. स्वत:बरोबर उर्वशीलाही त्याने तेथे नेले होते. पण राजा व्रतस्थ असताना उर्वशीने दैवी शक्तीने आपल्या गर्भाची वाढ क्षणात पूर्ण करवून घेऊन बाळकाचा जन्मही घडवून आणला. प्रसूतीची कोणतीही खूण अंगावर राहू नये म्हणून तिने खास दक्षता घेतली. त्या नवजात बालकाला तिने च्यवन ऋषींकडे सुपुर्द केले. त्यांना विश्वासात घेऊन तिने च्यवनांना बाळाचे शिक्षण व सांभाळ योग्य प्रकारे करण्यासाठी विनविले आणि ती परत आली.

च्यवन ऋषींनी बाळाचे "आयु" असे नाव ठेवले. यथावकाश त्याचे शिक्षणही निर्वेधपणे सुरू झाले. अशीच बारा वर्षे उलटून गेली.

संक्रांतीच्या पर्वकाळी सर्व राजस्त्रिया गंगायमुनेच्या संगमावर स्नानासाठी गेल्या होत्या. आपले वस्त्रालंकार सर्वांनी तीरावर ठेवले होते. रक्षकांचा पहारा होताच. त्यातच उर्वशीने तिला प्राणप्रिय असलेला तो लाल रत्नमणी ठेवला होता. आकाशातून उडणाऱ्या एका घारीला तो मांसखंड वाटला व क्षणार्धात झडप घालून तिने तो उचलून नेला. सर्वांची मण्यासाठी धावाधाव सुरू झाली. राजानेही प्रयत्न केला. पण ती घार जाणाऱ्या टप्प्याबाहेर निघून गेली. उडत उडत ती च्यवन ऋषींच्या आश्रमकक्षेत आली. कुमार आयुला ती दिसताच त्याचे प्रत्यंचा ओढून बाण सोडला. तत्क्षणी घारीच्या वर्मी तो बसला. घारीने पुन्हा नगरमार्गाकडे धाव घेतली. पण अर्ध्यावरच ती भूमीवर येऊन कोसळली. कोणीतरी तिच्या अंगातील बाण उपटून काढला आणि रत्न व तो बाण राजाकडे नेला.

राजा आनंदला. त्याने ते रत्न अग्नीने शुद्ध करून घेऊन उर्वशीला द्यावयास सांगितले आणि हा पराक्रम कोणाचा विचारले. पण ते कोणालाच ठाऊक नव्हते. तेव्हा राजानेच बाणावरचे नाव वाचले. अत्यंत आश्चर्याने तो पहातच राहिला. कारण त्यावर लिहिले होते "हा बाण उर्वशी पुरूरवा यांचा पुत्र आयु याचा आहे." ह्या कोड्याचे उत्तर उर्वशीकडूनच मिळेल

असे वाटून त्याने उर्वशीला बोलावण्याचे ठरविले.

तिकडे च्यवन ऋषींच्या आश्रमात आयुने हिंसा करून आश्रमाच्या नियमांचा भंग केला हे च्यवनांना कळले व त्यांनी त्याला नगरात त्याच्या मातापित्याकडे पाठविण्याचा निर्णय घेतला. लहानपणापासून त्याला जिने सांभाळले होते त्या तापसीबरोबरच त्यांनी आयुला प्रतिष्ठान नगराकडे रवाना केले.

राजप्रासादात आल्यावर तापसीने राजाची भेट घेतली व सर्व हकीकत राजाच्या कानावर घातली. शेवटी तिने उर्वशीला भेटण्याची परवानगी मागितली तेवढ्यात राजाज्ञेनुसार उर्वशीच तेथे आली. तापसी व तिच्याबरोबर आयुला पाहताच आता येथला निवास संपला हे जाणवून ती दु:खी झाली. तिने आयुला जवळ घेतले, कुरवाळले. तापसीला प्रणाम केला. आश्रमाची विचारपूस केली व च्यवनमुनींना प्रणाम सांगितला.

राजा मनातून तिच्यावर रागावला होता. पण राजसभेत रागावणे योग्य होणार नव्हते. आयुने सर्वांना प्रणाम केला, तेव्हा उर्वशीने भरतमुनींच्या शापापासून इंद्राने दिलेल्या उ:शापापर्यंत सर्व कहाणी राजाला सांगितली.

आता पुन्हा उर्वशीचा विरह या कल्पनेने राजाची मन अत्यंत विचलीत झाले. उर्वशीला निरोप देण्यापूर्वीच कुमार आयुला राज्याभिषेक करून आपण वानप्रस्थ स्वीकारावा असे त्याने ठरवले व तशा आज्ञा दिल्या. तेवढ्यात नारदमुनी आले. त्यांनी देवेन्द्राचा आनंददायी निरोप राजाला सांगितला. राजाच्या पराक्रमाची राक्षसांशी युद्ध करण्यासाठी देवेन्द्राला लवकरच खूप जरूर पडणार होती. राजाने शस्त्र खाली ठेवणे देवेन्द्राला कोणत्याही परिस्थितीत योग्य वाटत नव्हते. यास्तव देवेन्द्राने उर्वशी कायम पुरूरव्याकडेच राहू देण्याचा प्रस्ताव नारदांकडून पुरूरव्याकडे पाठविला होता.

सर्व प्रकारच्या संकटाचा परिहार झाला होता. उर्वशी आता सर्वार्थाने पुरूरव्याची झाली आणि सर्वत्र आनंदीआनंद झाला. विक्रमोर्वशीय सार्थ ठरले.

●

# ४ | मालविकाग्निमित्र



विदिशेचा राजा अग्निमित्र हा प्रजाहितदक्ष, सर्वगुणसंपन्न व प्रजेचा अत्यंत लाडका होता. त्याची थोरली राणी धारिणी आणि धाकटी इरावती दोघीही गुण्यागोविंदाने बहिणीबहिणीसारख्या एकमताने वागायच्या.

त्यादिवशी नेहमीप्रमाणे धारिणी राणी आपल्या प्रासादात सख्यांसमवेत हास्यविनोदात रममाण झालेली असतानाच तिचा भाऊ वीरसेन याच्याकडून तातडीचा निरोप व एक चित्र घेऊन दूत येऊन पोहोचला.

राणीने खलिता वाचला आणि चित्रावरचे आवरण दूर करून पाहिले. क्षणभर तिची नजर त्या चित्रावर खिळूनच राहिली. प्रमाणबद्ध शरीरयष्टी लाभलेल्या एका अतीव सुंदर कन्यकेचे ते चित्र होते.

"अहाहा, किती सुंदर आहे हे चित्र." असे उद्‌गार तिच्या तोंडून बाहेर पडले, "तिला इकडेच घेऊन या," ती म्हणाली.

"जशी आज्ञा राणी सरकार." असे म्हणून दूत तिला घेऊन आला. ती येताच राणीने तिला आपल्या जवळ बोलावले. तिच्याशी बोलताना राणीच्या लक्षात आले की ही आपल्या अन्य दासींसारखी सामान्य नाही तर रुपाप्रमाणेंच गुणांनीही वरचढ अशीच आहे. तिच्याबद्दल राणीच्या मनात स्नेहभाव उत्पन्न झाला व म्हणून आपल्या भावाच्या इच्छेनुसार राणीने तिला आपल्याकडे ठेवून घेतले. तसेच नृत्यगायन आदिमध्ये तिची गती पाहून तिला गणदासाकडे नृत्य-गायनाच्या शिक्षणासाठी सोपविले.

ही सुंदर तरुणी कोण होती ठाऊक आहे? ती होती विदर्भ देशाची राजकन्या मालविका. खरे तर तिचा विवाह राजा अग्निमित्राशीच व्हावयाचा होता. परंतु ती व तिचा भाऊ माधवसेन हे दोघेही दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडले आणि मालविकेने आपल्या दैवाला दोष देत हे दासीपण स्वीकारले.

मालविका गणदासाच्या मार्गदर्शनाखाली नृत्यगायनात तरबेज झाली होती.

अग्निमित्र एकदा धारिणी राणीच्या महालात गेला असताना, राजा अग्निमित्राला दिसू नये म्हणून राणीने लपवून ठेवलेले मालविकेचे चित्र अचानक राजाच्या नजरेस पडले. ते चित्र पहाताच राजाचे मन त्यावर जडले. राजाची ही अवस्था त्याचा प्रिय मित्र विदूषक याच्या लक्षात आली. "हे चित्र कुणाचे?" या राजाच्या प्रश्नाला राणी धारिणीने उत्तर दिले नाही तरी राजकुमारी वसुलक्ष्मी पटकन् म्हणाली, "ही तर आपली मालविका."

आता तर राजाला मालविकेला पाहण्याची खूपच उत्सुकता वाटू लागली. पण राजाची ही इच्छा पूर्ण होणे सोपे नव्हते. कारण एक तर राणीवशावर धारिणी राणीचाच अंमल चालत होता आणि चतुर राणीने आधीच मालविकेला गणदासाकडे पाठवून दिले होते. पण विदूषकाने राजाला आश्वासन दिले, मालविकेला भेटविण्याचे. विदुषकाने केलेल्या कारवायांमुळे हरदत्त व गणदास या दोन संगीत-नृत्य शिक्षकांमध्ये वाद

उत्पन्न झाला. कोण मोठा याचा निवाडा करण्यासाठी राजाने पंडिता कौशिकीची नेमणूक केली. कारण हरदत्त हा राजाचा तर गणदास हा राणीचा आवडता होता. त्यामुळे तिसऱ्यानेच हा वाद सोडवावा असे ठरले. शिष्यांच्या परीक्षेवरून उत्तम गुरू कोण हे ठरणार होते. त्यामुळे गणदासाची शिष्या मालविका व हरदत्ताची शिष्या इरावती या दोघींमध्ये स्पर्धा होण्याचे ठरले. त्यात मालविका वरचढ ठरली व राजाचा हेतुही विदूषकाच्या या युक्तीमुळे सफल झाला.

त्यानंतर राजधानीत वसंतोत्सव सुरू झाला. दरवर्षीच्या पद्धतीप्रमाणे अशोकवृक्षाला चरणस्पर्श करण्यासाठी राणी धारिणी येणार होती. पण अचानक झोके घेता घेता खाली पडल्याने राणीचा पाय दुखावला. तेव्हा स्वत:ऐवजी तिने स्वरूपसुंदर मालविकेला अशोकसंभावनेचा मान देण्याचे ठरविले. त्याबरोबरच तिने मालविकेला असे आश्वासनही दिले, " तुझ्या चरणस्पर्शाने जर चारपाच दिवसांत अशोक फुलांनी बहरला तर तुझी इच्छा मी पूर्ण करीन. " मालविकेबरोबर बकुलावलिकाही अशोक संभावनेच्या या समारंभासाठी तिला आळिता वगैरे लावून सजवू लागली. विदूषक बरोबर वेळ साधून राजाला घेऊन तेथे आला. आता मालविकेचे बकुलावलिकेबरोबरचे बोलणे ऐकून राजाला, स्वत:प्रमाणेच तिचीही अवस्था झाली असल्याचे निश्चित कळले. आणि मग राजा मालविकेशी काही बोलत असतानाच राणी इरावती आपल्या दासीसह निपुणिकेसह तेथे आली. मालविकेला राजाशी प्रेमाने बोलताना पाहून ती संतापली व तिने तडक धारिणीकडे जाऊन तक्रार केली. धारिणीने बकुलावलिकेला व मालविकेला कोषागाराखालील तळघरात बंदिवान करून ठेवले. पहारेकऱ्यांना खास सूचना दिली की स्वत:ची सर्पमुद्रांकित अंगठी दाखविली गेल्याशिवाय त्यांची मुक्तता करू नये व कोणालाही भेटण्याची परवानगी देऊ नये.

आता राजा व विदूषक दोघेही विचारमग्न झाले. काहीही करून मालविकेची सुटका झालीच पाहिजे या विचाराने त्यांना स्वस्थ बसवेना.

चतुर विदूषकाने स्वत:ला सर्पदंश झाला असल्याचा बहाणा केला.

राणी धारिणीने तत्काळ राजवैद्य धृवसिद्धीस पाचारण केले. आधीच पुष्कळ प्रकारांनी विदुषकाने सर्वांना घाबरवून टाकले होते. त्यातच धृवसिद्धीने विदूषकास तत्काळ स्वत:कडे घेऊन येण्यास सांगितले. आणि आधीच ठरविल्याप्रमाणे धृवसिद्धीने मंत्रशास्त्रानुसार विष उतरविण्यासाठी सर्पमुद्रा असलेली वस्तू ताबडतोब पाठविण्यास बजावले होते. त्यामुळे धारिणी राणीने विदूषकास पाठवताना स्वत:च्या हातातील सर्पमुद्रांकित अंगठीही पाठवून दिली. धृवसिद्धीकडे पोचताच त्या अंगठीचा उपयोग करून मालविकेला व बकुलावलिकेला सोडविण्यात आले.

मनातून मालविका आणि बकुलावलिका खूप घाबरल्या होत्या. पण मनोमनी परमेश्वराचा धावा करण्याखेरीज अन्य काहीच त्यांना करता येणे शक्य नव्हते.

राणी धारिणी मात्र खूप आनंदात होती. कारण तिच्या पुत्राच्या पराक्रमाची शुभवार्ता नुकतीच तिला समजली होती. त्याबरोबरच प्रमदवनाच्या पालिकेकडून अशोकवृक्ष बहरल्याची सुवार्ताही कळली. त्यामुळे राणीने मालविकेला तिच्या मनीची इच्छा पुरविण्याचे दिलेले वचनही लवकरच पूर्ण करण्याचे ठरविले.

राजाच्या व विदूषकाच्या कारवायांवरही राणीचे लक्ष होतेच म्हणून मालविकेला तात्काळ बोलावून घेऊन पंडिता कौशिकीला तिला ( मालविकेला ) नववधूचा श्रृंगार करविण्यास सांगितले.

मालविकेला स्वत:च्या मनासारखे सजवून नटवून धारिणी राणी तिला घेऊन अशोक वृक्षाजवळ घेऊन आली. एवढ्यात विदर्भ देशाच्या दोन दासी त्यांच्या सख्यांना भेटण्यास म्हणून विदिशेत धारिणी राणीकडे येऊन पोहोचल्या. अशोकवृक्षाजवळ उभ्या असलेल्या मालविकेला पाहून त्यांना अत्यानंद झाला व त्या आनंदातिशयाने उद्गारल्या, " अगबाई, राजकन्या मालविका - प्रणाम, युवराज्ञी प्रणाम. "

धारिणी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहू लागली. तेव्हा पंडिता कौशिकीने सर्व उलगडा केला. माधवसेन राजकन्या मालविकेला जहाजातून विदिशेला घेऊन येत असता त्यांच्यावर हल्ला होऊन सर्वांची ताटातूट कशी झाली

व राजज्योतिष्याने सांगितल्या भविष्यानुसार मालविकेला १ वर्ष अज्ञातवासात दास्यत्व पत्करून कसे रहावे लागले हे सर्व पंडिता कौशिकीने विस्तारपूर्वक सांगितले.

कोमल हृदयाच्या धारिणी राणीला हे सर्व ऐकून खूप वाईट वाटले. मालविकेचे व राजाचे प्रेमाचे गुपित राणीला आता चांगलेच ज्ञात झाले होते. त्यामुळे तिने राजाला तेथे पाचारण केले. राजा तयारच होता. राणीकडून खास निरोप येताच विदूषक व राजा प्रमदवनाकडे निघाले.

राणी धारिणीने सर्वांसमक्ष मालविकेचा हात राजाच्या हाती दिला व दोघांच्याही आनंदात तिनेही मोठ्या मनाने आनंद मानला. अशा प्रकारे मालविका व अग्निमित्राचे थाटात शुभमंगल झाले.

●

म. वा. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 3092 दिनांक 28/7/01
विषय बा.वा. क्र. ........
BVBK-0403012

# अटक मटकची उपलब्ध प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| गीतगुंजन | : | सौ. मनीषा बर्वे |
| संप | : | सौ. मनीषा बर्वे |
| इवलू टिवलू (पुरस्कारप्राप्त छान छान गीते) | : | निशिगंधा वाड |
| चिक् चिक् चिक्कोरी (पुरस्कारप्राप्त बालगीतसंग्रह) | : | सौ. मनीषा बर्वे |

## आगामी

| | | |
|---|---|---|
| महाकवी कालिदास (भाग दुसरा) | : | सौ. मनीषा बर्वे |

# परिचय



**नाव** :— सौ. मनीषा मधुसूदन बर्वे.

**शिक्षण** :— एम्. ए. बी. एड्., संस्कृत साहित्य विशारद, हिंदी कोविद, टीचर्स ट्रेनिंग सर्टिफिकेट कोर्स इन् योगा.

**पत्ता** :— ३०, मांगल्य, मुलुंड पूर्व, मुंबई ४०० ०८१.
१९३, शुक्रवार पेठ, बर्वेवाडा, काळ्या हौदाजवळ, पुणे ४११ ००२.

**छंद** :— वाचन, कथा, कविता, एकांकिका लेखन, काव्यगायन, इ.
व्यक्तिमत्त्वविकास शिबिरे, बालनाट्यशिबिरे, विचारविकास शिबिरे घेणे, इ.

**प्रकाशित साहित्य** :— १) गीतगुंजन - स्वागतगीते व प्रासंगिक गीतांचा संग्रह, २) संप - बालनाटिका, ३) चिक् चिक् चिकोरी - बालगीतसंग्रह.

बालवाडी, आनंद, गंमतजंमत, सुवासिनी, विशाखा, नवाकाळ, नवशक्ती, मुलुंडदीप, मुलुंड नागरिक, शाकंबरी, T. D. F., भारतीय शिक्षण इ. मधून कथा, कविता, लेख, नाटिका, काव्यकोडी, पानपूरके, इ. प्रकाशित.

आकाशवाणी मुंबई केंद्र व मुंबई दूरदर्शन केंद्र येथे कार्यक्रम

**पुरस्कार** :— डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार

'चिक् चिक् चिकोरी' पुस्तकास मराठी बालकुमार साहित्य संमेलनातर्फे १९९२ चा कै. बा. रा. मोडक प्रकाशन पुरस्कार

'ऋतुचक्र' संगीतिकेस कलारंजन लेखन पुरस्कार.

बालजीवनातील भावरम्यता टिकवून ठेवून मुलांना वास्तवाचे भानही रहावे यासाठी विविध प्रकारचे लेखन. मुलांसाठी कथा, कविता, काव्यकोडी, नाटके, इ. चे लेखन, अटकमटक बालनाट्य संस्थेची Founder Member. व सक्रीय कार्यकर्ती.

अटकमटकच्या वतीने बालनाट्यशिबिरे, बालनाट्यस्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा, संस्कृत एकांकिका स्पर्धा, एकपात्री अभिनयस्पर्धा, समूहगीत गायन स्पर्धा इत्यादींचे यशस्वी आयोजन.

बालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविधांगी कार्यक्रमांचे संचालन, व्याख्याने, कृतिसत्रे, प्रात्यक्षिके, इ.

मुलांच्या आरोग्याखाली योगासनांचे वर्ग, संस्कारवर्ग, इ.

महाराष्ट्र राज्य शासनातर्फे होणाऱ्या बालनाट्यशिबिरास मार्गदर्शक म्हणूनही यशस्वी सहभाग.
पुणे, औरंगाबाद येथे घेतलेल्या विचार विकास शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून यशस्वी सहभाग.